# <u>*वार्तापत्र*</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली दिनांक. 14/02/2018

## <u>*दारूबंदी पथकाचे जिल्हा भरात धाडसत्र*</u>

मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख सा., मा. अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) डॉ. महेश्वर रेड्डी सो, मा. अपर पोलीस अधिक्षक (नक्षलसेल) श्री. महेंद्र पंडीत सो. यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली दिनांक 10/02/2018 रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचारी पोलीस पथकासह मिळालेल्या माहितीच्या आधारे मौजा जैरामपुर येथील अवैध दारु विक्रेता अमित लक्ष्मण गोटपर्तीवार याचे मालकीचे राहाते घरी असलेल्या कृषी केंद्राचे गोडाऊन मध्ये अवैध दारु संबंधात झडती घेतली असता,

1. किमंत 2,88,000/- रुपये किमतीची देशी दारु रॉकेट संत्रा कंपणीचे एकुण 48 बॉक्स अशा प्रकारे एकुण प्रत्येकी 90 मिली क्षमतेच्या एकुन 4800 सिलबंद निपा जप्ती करुन नमुद आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन आष्टी येथे महा. दारुबंदी अधिनियम कलम 65 (ई) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास प्रभारी अधिकारी आष्टी पोनि. दिपक लुकडे हे करीत आहेत.

दिनांक 13/02/2018 रोजी कार्यालयात हजर असतांना गोपनिय सुत्राकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे, मौजा मोसम ता. अहेरी

येथील अवैध दारु विक्रेते नामे शशीकला कोडापे, पदमा कोडापे, दुर्गा सिडाम यांचे राहाते घरी अवैध दारु संबंधात झडती घेणेकामी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस पथक मौजा मोसम येथे पोहचुन स्थानिक पंचासमक्ष शशीकला शामराव कोडापे वय 40 वर्षे हिचे राहाते घरी झडती घेतली असता

1. किमंत 11,600/- रुपये ऑफिसर चॉईस विस्की कंपणीच्या 58 निपा

2.किमंत 14,400/- रुपये इंपेरियल ब्ल्यु व्हिस्की कंपणीच्या 48 सिलबंद निपा असा एकुण 26,000/- रुपये किमतीचा मुद्देमाल अवैध विक्रि करण्यात करीता ताब्यात बाळगला असतांना मिळुन आला.

नामे पदमा मारोती कोडापे वय 35 वर्षे हिचे राहाते घरी अवैध दारु संबंधात झडती घेतली असता,

1. किमंत 8000/- रुपये ऑफिसर चॉईस विस्की कंपणीच्या 40 निपा

तसेच दूर्गा आनंदराव सिडाम वय 40 वर्षे हिचे राहाते घरी अवैध दारु संबंधात झडती घेतली असता,

1. किमंत 12,000/- रुपये ऑफिसर चॉईस विस्की कंपणीच्या 60 निपा

अशा प्रकारे कारवाईत दरम्यान एकुण 46,000/- रुपये किंमतीचा अवैध दारु चा साठा जप्ती करुन वरील नमुद दारु विक्रेत्यांविरुध्द पोलीस स्टेशन अहेरी येथे महा. दारुबंदी अधिनियम कलम 65 (ई) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ./246 यादव मेश्राम, पोहवा/1395 जगन्नाथ मडावी हे करीत आहेत.

दिनांक 14/02/2018 रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस पथक गडचिरोली शहरात अवैध दारु रेड गस्तीवर तैनात असताना संशयास्पद मोटार सायकल क्रं. एम.एच 33 ई 4265 ला मो◌ैजा नवेगाव (मुरखडा) येथील ग्रा. प. समोरील रोडवर थांबवुन नमुद क्रमांकाचे मोटार सायकल चालक अंकुश शामराव मेश्राम रा. व्याहाड ता. सावली जि. चंद्रपुर हा त्याचे ताब्यातील मोटार सायकलवर पोत्यामध्ये देशी दारु बाळगुन बेकायदेशिर वाहतुक करीत असतांना खालील प्रमाणे माल मिळुन आला,

1. किमंत 27,780/- रुपये देशी दारु सुप्रीम सॉनीक रॉकेट संत्रा कंपणीच्या 90 मिली क्षमतेच्या एकुण 463 निपा मिळुन आल्यात

2. किमंत 55,000/- रुपये देशी दारुचे बेकायदेशिर वाहतुकीकरीता वापरण्यात आलेली बजाज पल्सर कंपणीची मोटार सायकल

अशा प्रकारे एकुन 82,780/- रुपयाचा मुद्देमाल जप्ती करुन दारु वाहतुक करणारा इसम अंकुश शामराव मेश्राम तसेच मुख्य दारु पुरवठा करणारा इसम नामे तलेश जाधव रा. पाथरी ता. सावली जिल्हा चंद्रपुर यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गडचिरोली येथे महा. दारुबंदी अधिनियम कलम 65 (ई) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/1465 दुर्वे हे करीत आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि युवराज घोडके व पथकाने महाशिवरात्री उत्सवा दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी याकरीता विशेष मोहिम राबवुन अवघ्या तीन दिवसात एकुन 3,61,780/- रुपयाची दारु व 55,000/- रुपये किमतीचा मोटार

सायकल अशा प्रकारे एकुन 4,16,780/- रुपयाचा मुद्देमाल जप्ती केला आहे. शहरात सर्वत्र दारूबंदी पथकाचे धाडसत्र सुरू आहे.



